# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**(सकाळ)**

जा.क्र. १८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०१/२०१८

**१) टाटा सुमो चालकांने गायीला धडक मारुन जखमी करुन तिचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०१/२०१८ चे २०.४२ यातील आरोपी टाटा सुमो गाडी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन विरुध्द दिशेन येणाऱ्या दुर्गेश मन्नालाल भुसले वय ४० वर्ष, रा. मांगली हा गायीला चारुन घराकडे नेत असता त्याचे गायीला खापा ते देव्हाडी रोड आम्रपाली रेस्टारेंट जवळ मांगली येथे धडक मारुन गंभिर जखमी करुन तिचे मरणास कारणीभुत झाल्याने दुर्गेध यांचे तोंडी रिपोर्ट व अपघात रजि. क्र. ०२/१८ दिनांक ०७/०१/२०१८ अन्वये व चौकशी अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. सरोदे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,४२९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) इंडीका व्हीस्टा गाडीच्या धडकेत चार जखमी :–**

दिनांक ०९/०१/२०१८ चे १२.०४ वाजता दरम्यान यातील मोटार सायकल क्र. एमच ३५ एसी ८०८२ चा चालक चांपराम रेवचंद बावनकुळे व २५ वर्ष, रा. पडसगाव व त्याचे मागे बसनारी महिला व २ मुले हे एनएच ६ रोड चारगाव फाटया कडुन विरसी फाटया वरुन विरसी गावी जाण्यासाठी मोटार सायकल वळविले असता त्याचे मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील इंडीका व्हीस्टा कार ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन समोर असलेल्या मोटार सायकल ला मागेहुन विरसी फाटा येथे धडक देवुन मोटार सायकल वर बसलेली सौ. गोपीचंद सिरसागर वय ३९ वर्ष, कु. हिमानी वय ८ वर्ष, रा. युगांतर वय ६ वर्ष, रा. तिन्ही रा. किन्हीमौखे व चालक– चोपराम यास गंभिररित्या जखमी व फॅक्चर करुन दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने डॉ. मेमो व चौकशी वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. पाटील यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) संगनमत करुन विवाहितेचा शारीरिक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/०१/२०१८ चे ०७.०० वाजता. दरम्यान यातील हा आरोपी क्र. १ चा सासरा लागत असुन यातील जखमी पिडीत महिला हिला आरोपी क्र. १ ते ५ ने आपले माहेरुन पैसे घेवुन ये व ईतर कारणा वरुन शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने तिने स्वत:ला जाळुन घेतले अशा प्रकारे पिडीत महिलेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४९८(अ),३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**४) महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/०१/२०१८ चे १९.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी आपले पतीसह घरी पुजा अर्चणा करीत असतांनी यातील आरोपीने घरात प्रवेश करुन फिर्यादीचे हात पकडुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन विनयभंग केला व पती सोडविण्यास आले असता त्याला सुध्दा ढकलढुकल करुन शिवीगाळ करुन मारण्यापिटण्यची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४५२,३५४,(अ),(१)(३)३२३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

५) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०८/०१/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीची अल्पवयीन लहान बहीन हिला फिर्यादीचे कायदेशीर ताब्यातुन फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व महाराष्ट्र शासनाचे परिपत्रका अन्वये पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

६) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :—

दिनांक ०९/०१/२०१८ चे २०.३९ वाजता. पुर्वी यातील मृतक गजेन्द्र उर्फ गजानन तुकाराम लेंड वय ४६ वर्ष, रा. नेहरु वार्ड वरठी हा दारु पिण्याचे सवईचा असुन त्याने मानसिक तानातुन स्वत:चे घरी घराचे लाकडी मयालीला पांढऱ्या चादरीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी ओमप्रकाश तुकाराम लेंडे वय ४८ वर्ष, रा. नेहरु वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

७) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :—

दिनांक ०८/०१/२०१८ चे १७.३० वाजता. दरम्यान यातील मृतक अंजनी धोंडुजी पिपरधरे वय ६५ वर्ष, रा. लोहारा हिने दिंनाक ०५/०१/२०१८ ला ओपी पॉईजीनींग खाल्याने उपचाराकरीता सा.रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बाभरे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंकी पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

८) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

**अ)** दिनांक ०९/०१/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ऑटो चालकाने जुना बस स्थानक तुमसर येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोशि. धावळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत

**ब)** दिनांक ०९/०१/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे मॅक्स गाडी चालकाने जुना बस स्थानक तुमसर येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोशि. धावळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चव्हाण पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत

**क)** दिनांक ०९/०१/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ऑटो गाडी चालकाने बोस वार्ड तुमसर येथील आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोशि. धावळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत

**९) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०९/०१/२०१८ चे १२.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल दारु पिवुन दारुचे नशेत बस स्थानक भंडारा येथे चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहालचे प्रमाण मिळुन आल्याने व तसेच वैद्यकीय परिक्षण रिपोर्ट वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. दिघोरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१०) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०९/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, सिहोरा, लाखांदुर, कारधा, व वरठी येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २६ लिटर हातभट्टी दारू किंमती १७६०/–रु. तसेच १३० लिटर ६८०मिली लिटर देशी दारु+१ ओमनी कार किंमती १,४३,५६०/–रु. तसेच जुगारातुन किंमती ३०३/–रु. असा एकुण १,४५,६२३/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०७/१२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – ०५ तीन सिटर वाहनांवरती– १२ केसेस व ईतर वाहनांवरती –९० केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.